MHKO050013622019

**समरी क्रिमिनल केस क्र.८३१/२०१९**

**मधील निशाणी क्र.७३ वरील आदेश**

**शारदा टेक्सटाईल कॉर्पोरेशन विरुध्द अंकित कॉटन मिल्स प्रा.लि.**

सदरचे प्रकरण हे यातील फिर्यादी यांनी आरोपीविरूध्द चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ नुसार दाखल केले आहे.

२. आरोपीने सदर अर्जाद्वारे अशी विनंती केली आहे की, सदरकामी प्रस्तूत आरोपी हे टेक्सटाईल्स संबंधी चाईना येथील Guangzhou येथे एक्झीबिशन आहे. त्यासाठी भारत सरकारकडे पासपोर्टसाठी अर्ज दिला आहे. परंतू सदरची केस पेंडींग असल्याने पासपोर्ट नुतणीकरण होणे अडचणीचे झाले आहे. सदर एक्झीबिशन हे दि.१५/०४/२०२४ ते दि.०५/०५/२०२४ पर्यंत असून आरोपी हे चाईना येथे जाणार आहे. सदर पासपोर्ट हे टुरिस्ट पासपोर्ट आहे. आरोपी हे केवळ एक्झीबिशन कार्यक्रम होताच पुन्हा येणार आहे. सदरकामी प्रस्तूत आरोपी हे कोठेही पळून जाणार नाही. प्रस्तूत आरोपी हे हजर राहून काम चालविण्यास तयार आहेत. तरी सदरकामी प्रस्तुत आरोपी यांना पासपोर्ट नुतणीकरण करणेस व चाईना येथील Guangzhou येथे Canton Fair मधील एक्झीबिशनला जाणेस परवानगी मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

३. सदर अर्जास फिर्यादी यांनी निशाणी ७८ कडे म्हणणे दाखल केले आहे की, आरोपी यांचा अर्ज फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारे मान्य व कबूल नाही. आरोपी यांचे अर्जातील आरोपी हे काम चालविण्यास तयार आहेत हा मजकूर खरा व बरोबर नाही. यातील आरोपी हे सदर कामी सन २०१९ पासून अनेक तारखांना गैरहजर आहेत. यातील आरोपी यांचे विरूध्द मे.कोर्टांनी अनेकवेळा अटक वॉरंट काढले आहेत. आरोपी हे प्रस्तूत अर्जात खोटी कथने करून मे. कोर्टाची दिशाभूल करीत आहेत. यातील आरोपी यांना देश सोडून जाण्याची परवानगी दिलेस आरोपी परत न येण्याची शक्यता जास्त आहे. आरोपी हे फिर्यादी यांचेकडून मोठया रकमेचा सूतमाल विकत घेवून त्याची रक्कम हडप करण्याच्या प्रयत्नात आहेत. प्रस्तूतचा अर्ज हा त्याचाच एक भाग आहे. आरोपी यांचा अर्ज मंजूर झाल्यास त्या प्रसंगी आरोपीकडून चेक रक्कमेइतकी बँक गॅरेंटी किंवा तेवढी रक्कम कोर्टात भरून घेण्यात यावी त्याशिवाय अर्ज मंजूर

करण्यात येवू नये. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली.

४. आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. फिर्यादीतर्फे विधिज्ञ यांनी म्हणणे दाखल केले. परंतू सदर अर्जावर युक्तीवाद केला नाही. करीता फिर्यादीतर्फे युक्तीवाद नाही. सदरचा अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येतो. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. सदरचे प्रकरण हे फिर्यादीच्या पूराव्याकरीता आहे. सदर अर्जासोबत निशाणी ७५ च्या दस्तऐवज यादी सोबत आरोपी क्र.२ यांचा पासपोर्ट अर्ज, पासपोर्टची व्हेरिफाईड प्रत, आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत, भारत सरकार यांचे ऑब्जेक्शन पत्राची संगणकीय प्रत, आरोपी क्र.३ यांचा पासपोर्ट अर्ज, आरोपी क्र.३ यांचा पासपोर्टची व्हेरिफाईड प्रत व आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत,भारत सरकार यांचे ऑब्जेक्शन पत्राची संगणकीय प्रत इत्यादी दस्त दाखल केले आहेत. आज रोजी सदरचे प्रकरण फिर्यादीच्या पूराव्याकरीता आहे. आरोपी करीता विद्वान वकिल यांनी विनंती केली की, आरोपीच्या गैरहजेरीत ते कामकाज चालविण्यास तयार आहेत. करीता अर्जातील नमूद कारणे व अभिलेखावरील दस्तऐवज यावरुन सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे -

## <u>आदेश</u>

१. निशाणी ७३ कडील अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येतो. आरोपीने नियमाप्रमाणे पासपोर्टकरीता सर्व अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास केवळ सदरचे प्रकरण प्रलंबित असल्याने केवळ या प्रकरणात आरोपीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी क्र.२ व ३ यांनी वेळोवेळी व जेव्हा सदर प्रकरणात गरज असेल तेव्हा हजर रहावे. आरोपींच्या गैरहजेरीच्या काळात त्यांचे विधिज्ञ यांनी सदर प्रकरणाचे कामकाज नियमानूसार पहावे.

३. आरोपींनी चाईना येथील Guangzhou येथील त्याचा रहिवाशी पत्ता व फोन नंबर तसेच रहिवासिचा कालावधी याबाबत संपूर्ण माहिती दयावी. तसेच आरोपींचा सध्याचा पत्ता, फोन नंबर याची संपूर्ण माहिती दयावी.

४. आरोपी क्र.२ व ३ यांनी चाईना येथून परत आल्यानंतर सदर प्रकरणात नियमाप्रमाणे हजर रहावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2024.04.03 16:51:52 +0530

**ठिकाण - इचलकरंजी** **(एम.एम.चौधरी)**

**दिनांक -०३/०४/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोर्ट नं.४, इचलकरंजी**